# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१५/११/१७

## दि.१४/११/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ६४१/१७,भादविक ३०७,१४३,१४४,१४७,१४९,५०६(१),भारतीय शस्त्र अधि. ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम क.३७(१)सह १३५ प्रमाणे. |
| **फिर्यादी** | सौरभ ऊर्फ अदिनाथ पवार,वय-१७ वर्षे,रा.ताथवडे गावठाण,जि.पुणे |
| **आरोपी** | १.रोशन पवार,वय-२४ वर्षे,रा.सर्वे नं.१४०/२,ताथवडे,पुणे व इतर सात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/११/२०१७ रोजी १५/३० वा. पेट्रोल पंपा जवळ ताथवडे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह नवले पेट्रोल पंपा जवळ ताथवडे,पुणे येथे बोलत असताना महेश पवार याने मला "तु आमच्या भांडणात मध्यस्थी करणारा कोण? थांब तुला आता संपुनच टाकतो" असे म्हणुन फिर्यादी यांना जीवे मारण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे डोक्यात कोयत्याने व इतरांनी तलवारीने वार केला. त्यावेळी फिर्यादी यांचे उजवे हाताचे कोपरा जवळ जखम झाली. फिर्यादी यांचे मित्र अनिकेत व ऋतीक जाधव हे त्यांचे मदतीकरीता येवु लागले असता,त्यांनाही जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादी यांचे डोक्यातुन व हातातुन रक्त येवुन ते खाली रोडवर पडल्यानंतर सर्वजण डांगे चौकाचे दिशेने पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.टि.एस.भोगम ९६८९४८३०७९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ५०२/१७,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | मुकेश गायकवाड,वय-३२,रा.१२९/९९९,दत्तवाडी,पुणे |
| **आरोपी** | पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१०/२०१६ ते दि.११/११/१७ रोजी नुतन मराठी विद्यालया समोर बाजीराव रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,दैनिक मराठी वर्तमान पत्रामध्ये "कोणत्याही समस्याने त्रस्त असाल तर आमच्याकडे या,१०० टक्के इलाज केला जाईल अन्यथा पैसे परत" या मथळयाखाली वेळोवेळी जाहिरात दिली होती. त्यावेळी फिर्यादी हे त्यांचे मित्रासह नमुद ठिकाणी जावुन त्यांना असलेल्या समस्या बाबात माहिती दिली असताना,सदर इसमांनी फिर्यादीस कोणतीही समस्या १०० टक्के बरी होईल असे सांगुन,त्यांना विश्वासात घेवुन सुरवातीस पुष्कराज,निलम व पाचु अशी तीन रत्ने एकुण २४,५००/- रु किची खरेदी करण्यास भाग पाडले. सदरची रत्ने खरेदी करुन फिर्यादी यांनी त्यांचे हाताचे बोटात घालुन एक वर्षे झाल्यानंतरही त्यांचा आजार बरा झाला नाही. तरी सदर इसमांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांची नमुद रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सोनवणे ९९२३६४०३०३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३४४/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | करण मालविया,वय-२६ वर्ष,रा.जबलपुर, मध्य प्रदेश |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१०/२०१७ रोजी २३/४५ वा. ते दि.१६/१०/२०१७ रोजी ०१/०० वा.चे सुमारास ऑन लाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादीची यांचे खाजगी बँकेचे डेबीट कार्ड हे त्यांचेकडे असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे खात्यातुन एकुण २८,४४४/- रूपये ऑनलाईन माध्यमाव्दारे काढुन घेऊन त्यांची फसवणुक केली आहे. (सदर गुन्हा हा लार्डगंज पो स्टे जबलपुर,राज्य मध्य प्रदेश येथुन ००/१७ अन्वये सहकारनगर पो स्टे येथे दाखल झाला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) ए.पी.वाघमळे ९८५०५५२९३३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी पो स्टे ३२५/१७,भादविक ३७६,३०६ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५१,रा.मोशी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | पंकज ऊर्फ अर्जुन कैलास सस्ते,वय-२७,रा.सस्ते वाडी,मोशी,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/११/१७ रोजी १०/५९ वा. मोशी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची सज्ञान मुलगी,वय-२२ हिस यातील नमुद इसम पंकज ऊर्फ अर्जुन कैलास सस्ते,वय-२७,रा.सस्ते वाडी,मोशी,पुणे याने प्रेमाच्या जाळयात फसवुन तीची दिशाभुल करुन तीचेशी शारिरीक संबंध करुन नंतर तीचेशी संपर्क करण्यास टाळाटाळ करुन मानसिक त्रास दिल्याने,फिर्यादी यांचे मुलीने शेतातील विहीरीत उडी मारुन आत्महत्त्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मुळे ९४२३१६८६९२ |

## दि.१४/११/१६७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | खडकी | भादविक ३०७,३४१,५०४,५०६,१४३,१४८,आर्म ४(२५) | गणेश शंरक बनकर | २१ |
| २ | खडकी | भादविक ३०७,३४१,५०४,५०६,१४३,१४८,आर्म ४(२५) | मनोज मंगेश प्रभाळकर | २० |
| ३ | खडकी | भादविक ३०७,३४१,५०४,५०६,१४३,१४८,आर्म ४(२५) | प्रशांत संजय शेट्टी | २० |
| ४ | खडकी | भादविक ३०७,३४१,५०४,५०६,१४३,१४८,आर्म ४(२५) | अजय हनुमंत अलगुडे | २१ |
| ५ | हिंजवडी | भादविक ३०४(अ) | संजय लोटन वाघ | ३९ |
| ६ | हिंजवडी | भादविक ३९७,३४ | आकाश बाळासाहेब कडु | २१ |
| ७ | हिंजवडी | भादविक ३९७,३४ | आकाश प्रदीप घाडगे | २१ |
| ८ | दत्तवाडी | भादविक ३०७,आर्म ४(२५) | पिंटया सोमनाथ कांबळे | २७ |
| ९ | वारजे | भादविक ३९५,३९४,४२७,५०४ | महेश नवनाथ गरूड | २१ |
| १० | हडपसर | भादविक ४५७,३८०,५११ | प्रतिक संजय वाघमारे | १९ |
| ११ | हडपसर | भादविक ४५७,३८०,५११ | सागर दत्तात्रय भालेराव | २० |
| १२ | हडपसर | भादविक ४१९,४२०,४६५,४६८,४७१,३४ | राज गुलाब शेख | २७ |
| १३ | मुंढवा | भादविक ४०६,४२० | शरयु विनायक ठकार | ३९ |
| १४ | स्वारगेट | भादविक ४०६,४२० | अभिजीत गजानन महिंद्रे | ३० |
| १५ | पिंपरी | भादविक ४५२,३५४,३२३,५०४,५०६ | दिपक यशवंत जानराव | ३० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**